ePaper
| वर्ष - 7 | अंक - 159 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 15 ऑक्टोबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## जरांगे पाटलांनी टोकाची भूमिका घेऊ नये: बच्चू कडू



### आतील पानांत


- टीम इंडियाचा आठवावा प्रताप!
- शत्रूशी लढण्यासाठी सर्व ताकद वापरू
- सुप्रिया सुळेंना जवळचा चष्मा!
- मुंबईचा 'लिटफेस्ट' दसऱ्यानंतर लगेच!


# पालकमंत्री 'ॲक्शनमोड'वर!

## » प्रलंबित विकासाकामांचा आढावा : आयुक्त शेखर सिंह यांना दिल्या सूचना

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची सूत्रे स्विकारताच उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी पिंपरी-चिंचवड शहरातील प्रलंबित विकास कामे मार्गी लावण्याची आग्रही भूमिका घेत प्रमुख अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पुणे येथील सर्किट हाऊसमध्ये बैठक घेतली. या बैठकीमध्ये पाणी, ड्रेनेज, ट्रॅफिकच्या समस्येसह शहरातील विविध प्रलंबित विकासकामांचा आढावा घेत सर्व कामे तात्काळ मार्गी लावण्याचे आदेश दिले.**



पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी शुक्रवारी सूत्रे स्विकारली. यानंतर दुसऱ्याच दिवशी शनिवारी (दि.१४) विभागीय आयुक्त सौरभ राव, जिल्हाधिकारी राजेश देशमुख, पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह, पुणे महापालिका आयुक्त विकास कुमार यांच्यासह प्रमुख अधिकाऱ्यांसह आमदार अण्णा बनसोडे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे व इतर प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या आढावा बैठकीदरम्यान अजितदादा पवार यांनी पिंपरी-चिंचवड शहरातील प्रमुख प्रकल्पांची स्थिती, प्रलंबित विकासकामे, पाणीटंचाई, ड्रेनेज समस्या, वाहतूकीच्या समस्या, स्वच्छता यासह विविध विषयांची सखोल माहिती घेऊन चर्चा केली. व प्रलंबित विकासकामे मार्गी लावण्याचे आदेश दिले.

पालकमंत्रीपदाची सूत्रे स्विकारताच २४ तासांच्या आतच दादा ॲक्शन मोडमध्ये आल्याने तसेच पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासावर लक्ष केंद्रित केल्यामुळे शहरातील अनेक प्रकल्प मार्गी लागण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

> "पिंपरी-चिंचवडची रखडलेली कामे तात्काळ मार्गी लावताना कोणतीही चुकीची कामे खपवून घेतली जाणार नाहीत. चुकीच्या कामांना मी कधीच थारा दिलेला नसून नागरिकांच्या समस्या तात्काळ सोडवितानाच शहराच्या भविष्याचा विचार करून विकासकामांचे नियोजन करण्याचेही आदेश प्रशासनाला दिले आहेत.
>
> – **अजित पवार,** उपमुख्यमंत्री..

# नवरात्रोत्सवातील मंडप भाडे अखेर रद्द!

## » शेखर काटे यांच्या मागणीला यश : आयुक्त शेखर सिंह यांचा सकारात्मक निर्णय

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील नवरात्रोत्स मंडळांचे मंडप शुल्क माफ करण्याबाबत महापालिका प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली. याबाबत आयुक्त शेखर सिंह यांनी आदेश काढले आहेत. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष शेखर काटे यांनी याबाबत प्रशासनाकडे मागणी केली होती. त्याला यश मिळाले आहे.**



नवरात्र उत्सव हा उत्साहाचा सण आहे. या उत्सवानिमित्त शहरात उभारण्यात येत असलेल्या पत्राशेड, मंडपाचे भाडे महापालिका प्रशासनाकडून वसूल केले जाते. मात्र, गणेशोत्सवाप्रमाणे नवरात्रोत्सवातही मंडप भाडे माफ करावे, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने केली होती. त्याबाबत आयुक्त शेखर सिंह यांची भेट घेवून निवेदन दिले होते.

शेखर काटे म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका आयुक्तांना निवेदन दिले होते. या वेळी विरोधी पक्षनेते नाना काटे, माजी नगरसेविका माया बारणे, राष्ट्रवादी युवकचे कार्याध्यक्ष प्रसाद कोलते, पदाधिकारी रोहीत काटे उपस्थित होते. त्यावेळी आयुक्तांनी सकारात्मक निर्णय घेवू असे आश्वासन दिले होते.

नुकताच गणेशोत्सव उत्साहात पार पडला. गणेशोत्सवात शहरातील सर्व गणेश मंडळांनी शासनाने घालून दिलेल्या नियमांचे तंतोतंत पालन केले.

### महापालिका प्रशासनाचे आभार...

» गणेशोत्सवात कोणतेही गालबोट लागले नाही. सणही आनंदात साजरा करण्यात आला. गणेशोत्सवात शासनाकडून देखील सहकार्य करत काही गोष्टींमध्ये सवलत देण्यात आली होती. त्याच पार्श्वभूमीवर आगामी नवरात्र उत्सवात शासनाकडून सहकार्य मिळावे अशी शहरातील मंडळाची अपेक्षा होती. उत्सवानिमित्त शहरात उभारण्यात येत असलेल्या पत्राशेड, मंडपाचे भाडे महापालिका प्रशासनाकडून वसूल केले जाते. मात्र, गणेशोत्सवाप्रमाणे नवरात्रोत्सवातही मंडप भाडे रद्द करण्यात आले आहे. याबद्दल महापालिका प्रशासनाचे आभार व्यक्त करतो, असेही शेखर काटे यांनी म्हटले आहे.

# पालकमंत्री अजित पवारांनी केली ससूनच्या अधिष्ठाताची कानउघाडणी!

## » आरोग्य सुविधांकडे दुर्लक्ष झाल्यास कारवाई

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**ससूनच्या प्रवेशद्वारावर सापडलेले अमली पदार्थ आणि अमली पदार्थांचा तस्कर ललित पाटील पलायन प्रकरणी उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री अजित पवार यांनी ससूनचे अधिष्ठाता डॉ. संजीव ठाकूर यांना शुक्रवारी चांगलेच फैलावर घेतले.**

गैरप्रकारांना कोण जबाबदार आहे, असे विचारत ससून प्रशासनाच्या कार्यपद्धतीविषयी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. आता निर्णय घेण्याची वेळ आल्याचा गर्भित इशारा पवार यांनी या वेळी दिला. ससून रुग्णालयातील अमली पदार्थांच्या प्रकरणानंतर रुग्णालयातील अनेक प्रकरणे समोर आली. रुग्णालयातील कैद्यांच्या कक्षात अनेक कैदी महिनोंमहिने पाहुणचार घेत असल्याचेही यानिमित्ताने समोर आले.

उपमुख्यमंत्री अजित पवार हे पालकमंत्री झाल्यानंतर प्रथमच त्यांनी पुण्यात येऊन विविध विकासकामांचा आढावा घेतला. त्यामध्ये शहरासह जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेचाही आढावा घेतला. या बैठकीला विभागीय आयुक्त सौरभ राव,




जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, ससून रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. ठाकूर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नागनाथ यमपल्ले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रामचंद्र हंकारे आदी उपस्थित होते. या बैठकीसाठी नियोजनात सकाळी ११ ते १२ अशी वेळ देण्यात आली होती. या एका तासात पुणे, पिंपरी-चिंचवड आणि उर्वरित ग्रामीण भागातील आरोग्य यंत्रणेचा आढावा घेण्यात येणार होता. पालकमंत्री पवार यांनी बैठकीच्या सुरुवातीला ससूनचे अधिष्ठाता डॉ. ठाकूर यांच्याकडे मोर्चा वळवला. पुढील २५ मिनिटे पवार यांनी ससून प्रशासनाला धारेवर धरले. ससूनमध्ये घडलेल्या घटनेला कोण जबाबदार आहे, असा सवाल त्यांनी केला. त्यावर डॉ. ठाकूर यांनी थातूरमातूर उत्तरे देण्याचा प्रयत्न केला. त्यावर पवार यांचे समाधान झाले नाही. त्यानंतर पवारांनी वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेल्या बातम्या वाचून दाखविल्या. तसेच आता निर्णय घेण्याची वेळ आल्याचा इशाराही या वेळी दिला. आरोग्य सुविधांसाठी राज्यस्तरावरून अधिकचा निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आवश्यकता असल्यास जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातूनही निधी देण्यात येईल. जिल्ह्यातील सर्व शासकीय रुग्णालयांनी औषधाची कमतरता भासणार नाही, याची दक्षता घ्यावी. येत्या मार्चअखेरपर्यंत दोन्ही महापालिका क्षेत्रात खाटांची संख्या वाढवावी. ससून रुग्णालयात अत्याधुनिक उपचार उपलब्ध करून देण्यात आले असून, त्याचा सर्वसामान्य रुग्णाला लाभ झालाच पाहिजे. यात दुर्लक्ष झाल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात येईल.

### अधिष्ठातांनी पळ काढला

» वाढत्या रुग्णसंख्येला आवश्यक उपचार, औषधे पुरेशी आहेत का, अवघड शस्त्रक्रिया शासकीय सुविधा, मनुष्यबळ याबाबत पालकमंत्र्यांनी आढावा घेतला, बैठकीनंतर एवढीच माहिती पत्रकारांना देऊन ससूनचे अधिष्ठाता डॉ. ठाकूर यांनी अधिक बोलण्यास नकार देत गाडीत बसून पळ काढला.

# 'लाडक्या लेकी'च्या सक्षमीकरणासाठी सरकारची संरक्षणाची सावली

## » सुजाता पालांडे: पिंपरी-चिंचवड भाजपा महिला आघाडीतर्फे फडणवीस यांचे अभिनंदन

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्याच्या सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेली लेक लाडकी योजना राज्यात लागू करण्याचा निर्णय महायुती सरकारच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाल्याने महिला सक्षमीकरणाच्या महाराष्ट्राच्या परंपरेत मानाचा नवा तुरा खोवला गेला आहे.**

केवळ कागदी धोरणे आणि वारेमाप घोषणा करण्याची परंपरा मोडीत काढून घोषणांची अंमलबजावणी करणाऱ्या महायुती सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे राज्यातील असंख्य गरीब कुटुंबांतील मुलींचे भविष्य उजळणार आहे, असा विश्वास भाजप महिला आघाडीच्या सौ. सुजाताताई सुनिल पालांडे यांनी व्यक्त केला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वित्तमंत्री या नात्याने राज्याचा अर्थसंकल्प सादर करताना 'लेक लाडकी' योजनेचा तपशील जाहीर केला होता. आंतरराष्ट्रीय कन्या दिनाच्या पूर्वसंध्येस आणि दुर्गा उत्सवाच्या पार्श्वभूमीवर ही योजना जारी करून देवेंद्र फडणवीस यांनी या संकल्पाची पूर्तता केली आहे, असे त्या म्हणाल्या. मुलींच्या सक्षमीकरणासाठी आणि गरीब कुटुंबांतील मुलींना लखपती बनवून स्वतःच्या क्षमतेवर शिक्षणाच्या सर्व संधी प्राप्त करता याव्यात यासाठी आखलेल्या या योजनेद्वारे वयाच्या १८ व्या वर्षी मुलीच्या खात्यात



एक लाखांपर्यंतची रक्कम जमा करण्यात येणार आहेत.

महिलांना एसटी प्रवासात पन्नास टक्के सवलत देण्याच्या क्रांतिकारी निर्णयामुळे राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणाचा मोठा टप्पा गाठला गेला आहे. केंद्रातील मोदी सरकारने अलीकडेच महिलांना राजकीय आरक्षण जाहीर करून समान संधींचे वचन पूर्ण केले आहे. लेक लाडकी योजनेमुळे राज्यातील गरीब कुटुंबात जन्माला येणाऱ्या कोणत्याही मुलीच्या शैक्षणिक प्रगतीत आर्थिक अडचणीचा अडथळा येणार नाही.

भावी पिढीतील मुलींच्या सक्षमीकरणाची दमदार प्रक्रिया लेक लाडकी योजनेतच्या क्रांतिकारी अंमलबजावणीतून सुरू झाली आहे, असे सौ. सुजाताताई सुनिल पालांडे म्हणाल्या.

महाराष्ट्राच्या लेकींना आत्मनिर्भर करणारी ही दूरदर्शी योजना आखल्याबद्दल राज्यातील महिलावर्गाच्या वतीने आपण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करतो, असे त्या म्हणाल्या.

### शासनामार्फत थेट लाभार्थी हस्तांतरण (DBT) द्वारे लाभार्थी रक्कम अदा होणार...

» पिवळ्या व केशरी रेशनकार्डधारक कुटुंबात मुलीचा जन्म झाल्यावर ५ हजार रुपये, इयत्ता पहिलीत गेल्यावर ६ हजार रुपये, सहावीत गेल्यावर ७ हजार रुपये, ११ वीत गेल्यावर ८ हजार रुपये, १८ वर्षे पूर्ण झाल्यावर ७५ हजार रुपये, अशा रितीने एकूण त्या मुलीस १ लाख १ हजार रुपये एवढा लाभ मिळेल. शासनामार्फत थेट लाभार्थी हस्तांतरण (DBT) द्वारे लाभाची रक्कम लाभार्थ्यांना अदा करण्यात येणार आहे. १ एप्रिल २०२३ नंतर कुटुंबात जन्मणाऱ्या १ अथवा २ मुलींना त्याच प्रमाणे १ मुलगा व १ मुलगी असल्यास मुलीला या योजनेचा लाभ मिळेल. दुसऱ्या प्रसुतीच्या वेळी जुळी अपत्ये जन्माला आल्यास त्यापैकी १ मुलगी किंवा दोन्ही मुली असल्यास दोघींना या योजनेचा लाभ मिळेल, अशी माहितीही महिला मोर्चा अध्यक्षा सौ. सुजाताताई सुनिल पालांडे यांनी यावेळी दिली.

# मुलांमध्ये जबाबदारीचे भान निर्माण व्हावे!

## विनायक भोंगाळे यांचे मत : वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून विधायक उपक्रमांचे आयोजन

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**स्पर्धेच्या युगात पालकांनी मुलांना सुरक्षित न ठेवता स्पर्धेत उतरण्यास तयार करावे. पाण्यात पडल्यावर पोहायला येतेच. त्यामुळे मुलांना यशस्वी झालेले पहायचे असेल, तर त्यांच्याकडे जबाबदारी द्या. त्यांना प्रयत्न करु द्या, असे मत स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक व अध्यक्ष विनायक भोंगाळे यांनी व्यक्त केले.**





स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाचे (एसव्हीएसपीएम) संस्थापक व अध्यक्ष विनायक भोंगाळे यांच्या जन्मदिनानिमित्त अनाथ विद्यार्थ्यांना पुस्तक वाटप, ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी, बीजवाटप असे विविध विधायक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विधायक कार्याबरोबर सामाजिक बांधिलकी जपून समाजाचे देणे लागतो या भावनेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी भोंगाळे बोलत होते. यावेळी भोंगाळे कुटुंबातील ज्येष्ठ मार्गदर्शक उखरडा भोंगाळे, स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक कविता कडू- पाटील, खजिनदार विजया भोंगाळे, सचिव संजय भोंगाळे, विश्वस्त सरिता विखे-पाटील, योगेश एंटरप्राईजेसचे विशेष कार्यकारी अधिकारी योगेश भोंगाळे, श्री संत गजानन महाराज सेवाभावी ट्रस्ट, श्री संत सदगुरू बाळुमामा ट्रस्ट, अभ्युदय बँकेचे प्रमुख अधिकारी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित हेते.

कार्यक्रमाचे स्वागत लेझीम व ढोल तशाच्या गजरात करण्यात आले. यावेळी भोंगाळे यांच्या जीवन संघर्षावर आधारित नाटिका सादर करण्यात आली. स्वामी विवेकानंद काव्य मंच तर्फे कविता सादर केली. प्रसिद्ध उद्योजक मयुर विखे-पाटील, प्रल्हाद इंगळे यांच्यासह मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

> ज्यांना आपले भविष्य घडवायचे असेल, तर आराम हराम आहे, ही बाब लक्षात घेतली पाहिजे. परिस्थिती निर्माण झाल्याशिवाय माणूस घडत नाही. माणूस घडल्याशिवाय समाज घडणार नाही. त्यामुळे प्रत्येकाने कष्ट करण्याची आणि संघर्ष करण्याची तयारी ठेवली पाहिजे.
> **–विनायक भोंगाळे, संस्थापक अध्यक्ष, एसव्हीएसपीएम..**

### श्री विनायक पतसंस्थेची स्थापना...

स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळांतर्गत सर्व शाळांचे आणि योगेश एंटरप्राईझेस ग्रुपच्या कर्मचारी यांच्यासाठी श्री विनायक सेवकांची सहकारी पतसंस्थेच्या स्थापनेची घोषणा यावेळी करण्यात आली. नवनिर्वाचित अध्यक्ष व संचालकांचा सन्मान करण्यात आला. आपल्या कर्मचाऱ्यांची मुलांच्या शिक्षणासाठी, व्यवसायासाठी आणि आपल्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ असायला हवे, या संकल्पनेतून आम्ही या संस्थेची स्थापना करीत आहोत, अशा भावना यावेळी विनायक भोंगाळे यांनी व्यक्त केल्या.

# 'कृषिप्रधान' भारतात बैल शेतकऱ्यांचा हक्काचा सवंगडी!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या भावना

### लांडगे कुटुंबियांकडून पारंपरिक पद्धतीने बैलपोळा साजरा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शेतकऱ्यांचा हक्काचा सवंगडी बैल आहे. शेतात राबणाऱ्या शेतकऱ्याबरोबर बैलाप्रति कृतज्ञता भाव असला पाहिजे. शेती-माती आणि संस्कृती जपण्यासाठी आणि बळीराजाच्या सन्मानासाठी प्रत्येकाने पुढाकार घेतला पाहिजे, अशा भावना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या.**



आमदार लांडगे यांनी कडूस येथील निवासस्थानी बैलपोळा निमित्त स्वत: बैलांचा साजश्रृंगार करण्यासाठी पुढाकार घेतला. सकाळी बैलांना आंघोळ घालण्यात आली. बैलांच्या पाठीवर छान नक्षीकाम केलेली झूल, सर्वांगावर गेरूचे ठिपके, शिंगांना बेगड, डोक्याला बाशिंग, गळ्यात कवड्या व घुंगरांच्या माळा, नवी वेसण, नवा कासरा असा साज श्रृंगार करण्यात आला. सायंकाळी पूजा करुन बैलाला खायला गोड पुरणपोळी व सुग्रास अन्नाचा नैवेद्य दिला.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, जगभरात आजही आपला भारत देश 'कृषीप्रधान' म्हणून ओळखला जातो. शेतकरी, बळीराजा या देशाचे अन्नदाता आहेत. शेतकऱ्यांसोबत शेतात राबणारा हक्काचा 'सवंगडी' म्हणजे बैल. भारतीय संस्कृतीमध्ये बैलाला आदर आणि श्रद्धेचे स्थान आहे. बैलपोळा निमित्त आज आमच्या गोठ्यातील बैलांना पारंपरिक पद्धती साजश्रृंगार केला. बैलगाडा शर्यतीवरील बंदी उठवण्यासाठी आपण सर्व भूमिपुत्रांनी सर्वोच्च न्यायालयापर्यंत दिलेला लढा... हा आपल्या शेतीसाठी..मातीसाठी... आणि संस्कृतीसाठी होता. त्या सर्व आठवणी पुन्हा एकदा जाग्या झाल्या आहेत.

# पिंपरी महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थी तंत्रज्ञान सक्षम होणार; सात शाळांमध्ये 'कोडिंग' वर्ग

। पिंपरी।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानासह सक्षम करणे, कौशल्य विकसित करण्यासाठी सात शाळांमध्ये 'कोडिंग' वर्ग सुरू करण्यात आले आहेत. पाचवी ते आठवीच्या एक हजार १८९ विद्यार्थ्यांनी कोडिंगच्या जगात पहिले पाऊल टाकले. या वर्गांद्वारे कौशल्यासह तांत्रिक सर्जनशीलता, समस्या सोडवण्याची क्षमता, नवकल्पनांना चालना मिळणार आहे.

महापालिकेच्या ११० प्राथमिक व १८ माध्यमिक शाळा कार्यरत आहेत. या शाळांमध्ये ४२ हजारांपेक्षा अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांचे कौशल्य वाढविण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम हाती घेतले आहेत. संगणक प्रणाली, कोडिंग शिक्षण देण्याच्या दृष्टीकोनातून पाय जॅम फाउंडेशनच्या माध्यमातून पालिकेच्या सात शाळांमध्ये मोफत कोडिंग वर्ग सुरू केले आहेत. हे वर्ग आठवड्यातून दोनदा दोन तास घेतले जात असून, तीन ते चार वर्षांचा हा अभ्यासक्रम आहे. या वर्गांद्वारे विद्यार्थी केवळ कौशल्य शिकत नाहीत. तर, तांत्रिक सर्जनशीलता, अनुभवात्मक संगणक विज्ञान शिक्षण, समस्या सोडवण्याची क्षमता आणि नवकल्पना वाढवत आहेत. भविष्यात तंत्रज्ञान, अभियांत्रिकी महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल. त्यासाठी विद्यार्थी तयार केले जात आहेत.

# पाकिस्तान : क्रिकेटग्रस्त, भारतग्रस्त संस्कृती!




**भारत आणि पाकिस्तान यांच्यात विश्वचषक स्पर्धेतील साखळी सामना आज शनिवारी अहमदाबादेत होतोय. एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेतला हा या दोन संघांतला आठवा सामना. आधीचे सातही भारताने जिंकले. त्यामुळे प्रत्येक विश्वचषक स्पर्धेची पाकिस्तानमधील लाखो क्रिकेटरसिक चातकासारखे वाट पाहात असतात. कधी एकदा ही स्पर्धा सुरू होते आणि कधी एकदा..**

किमान एकदा तरी.. त्यात भारताला हरवायला मिळते. क्रिकेटच्या या मायाजालातून बाहेर पडण्याची पाकिस्तानची इच्छा नाही. क्षमताही नाही. पाकिस्तानचे क्रिकेटप्रेम, नव्हे आसक्ती, अशी वर्षानुवर्षे गोठलेल्या ('सस्पेंडेड ॲनिमेशन'च्या) अवस्थेत आहे. गतशतकात सत्तर, ऐंशी आणि नव्वदच्या दशकांत पाकिस्तानचा संघ क्रिकेटमधील महासत्तांशी टक्कर घेऊ शकत होता आणि स्वत:ला महासत्ता म्हणवूनही घेऊ शकत होता. इम्रान खान, माजिद खान, आसिफ इक्बाल, सर्फराझ नवाझ, झहीर अब्बास, मुदस्सर नझर, वसिम बारी, जावेद मियाँदाद, अब्दुल कादिर, रमीझ राजा किंवा त्यानंतरच्या पिढीत वासिम अक्रम, वकार युनुस, सलीम मलिक, राशिद लतीफ, इंझमाम उल हक, आमिर सोहेल, सईद अन्वर, सक्लेन मुश्ताक, शाहिद आफ्रिदी असे




उत्तमोत्तम खेळाडू या संघाकडून खेळले. ऐंशीच्या दशकातील दिग्विजयी वेस्ट इंडिज संघासमोर नांगी न टाकता उभा राहणारा पाकिस्तान हा एकमेव संघ होता. त्यांच्याकडील गुणसंपन्नता पाहता, एकापेक्षा अधिक विश्वचषक त्यांनी जिंकायला हवे होते. पण हे घडले नाही. त्याची कारणे म्हणून जी चर्चिली जातात, त्यात अंतर्गत भांडणे आणि भ्रष्ट प्रवृत्तींचा शिरकाव यामुळे पाकिस्तान बऱ्याचदा पूर्ण ताकदीनिशी खेळलेच नाही, असा एकंदरीत सूर असतो. त्यात तथ्य आहे. मात्र पाकिस्तानी क्रिकेट संघाचा प्राधान्यक्रम बदलला हेही दखलपात्र ठरते. पाकिस्तानचे लक्ष पूर्णपणे भारतावर केंद्रित झाले. क्रिकेटजगतातील जवळपास सगळ्याच संघांविरुद्ध जिंकण्याची क्षमता पाकिस्तानी संघात त्या काळी असताना, हा संघ केवळ भारताविरुद्ध क्रिकेटच्या मैदानात जिंकण्यातच समाधान मानू लागला. पाकिस्तानी संघाची सारी ऊर्जा, उत्कटता भारताविरुद्धच दिसून येत होती. असे का घडले असावे? विश्वचषक १९८३ आणि चँपियन ऑफ चँपियन्स १९८५ या अजिंक्यपदांमुळे भारताचा क्रिकेटमधील भाव नक्कीच वधारला. पण एप्रिल १९८६ मध्ये शारजात जावेद मियाँदादने चेतन शर्मांच्या गोलंदाजीवर शेवटच्या चेंडूवर षटकार मारून पाकिस्तानला सामना आणि ती स्पर्धा जिंकून दिली. त्या विजयासमोर पाकिस्तानी मंडळींना चँपियन ऑफ चँपियन्स स्पर्धेतील भारतासमोरचे दोन पराभव किरकोळ वाटतात. त्या षटकारानंतर शारजात प्रत्येक स्पर्धेमध्ये भारताला मात देणे, हा पाकिस्तानी क्रिकेटपटूंचा एककलमी कार्यक्रम बनला. 'क्रिकेटर्स बेनिफिट सीरिज'च्या नावाखाली अब्दुल रहमान बुखातेर नामे कुणी धनवान शारजात क्रिकेटजत्रा भरवू लागला. त्यात इतरही देश येऊन खेळून जायचे. पण मुख्य खेळ भारत विरुद्ध पाकिस्तान यांचाच. काश्मीरच्या मुद्द्यावरून भारतविरोधाचे विष पाकिस्तानी समाजात कालवणारे आणि लष्करी-जिहादी युतीचे विखारी धोरण त्या देशात राबवणारे जनरल झिया उल हक यांची राजवट क्रिकेटच्या मैदानावरील विजयांसाठी प्रेरक ठरू लागली. खलिस्तान फुटीरवादाला आलेले अपयश काश्मीरमधील विभाजनवादी तत्त्वांना पाठिंबा देऊन धुऊन काढण्याचे जनरल झियांचे मनसुबे होते. काश्मीर विभाजनवादाला सशस्त्र आणि सधन मदत करून 'टू ब्लीड इंडिया विथ थाऊजंड कट्स' हे धोरण झियांच्याच अमदानीत अधिक रेटले गेले. याच काळात कोण्या पाकिस्तानी क्रिकेटपटूने 'भारताशी क्रिकेटचा सामना म्हणजे आमच्यासाठी धर्मयुद्धच' असे उद्गार काढले होते. नव्वदच्या दशकात सातत्याने शारजात स्पर्धा होत होत्या आणि भारताचा पराभव करण्यात पाकिस्तानी क्रिकेट व्यवस्था समाधान मानत होती. भारत आणि पाकिस्तान यांच्यात विश्वचषक स्पर्धेतील पहिला सामना १९९२ मध्ये झाला.

## संपादकीय »

# न्यायदेवतेपुढील पेच!

***आपला वैद्यकीय गर्भपाताचा कायदा विशिष्ट परिस्थितीत २० व्या आणि काही अपवादात्मक परिस्थितीत २४ व्या आठवड्यापर्यंत गर्भपाताची परवानगी देतो.***

माणसाचे जगणे महत्त्वाचे की जगण्याचे तत्त्वज्ञान? महत्त्व व्यक्तीला असायला हवे की अनेक व्यक्तींनी मिळून तयार झालेल्या व्यवस्थेला? एखादी निर्मिती महत्त्वाची की ती निर्मिती करणाऱ्या निर्मिकाची इच्छा महत्त्वाची? कोणत्याही जीवावर हक्क कुणाचा, पालकांचा की समाजाचा? मुळात एखादा जीव जन्माला येणे कुणी ठरवू शकत नसेल तर त्याचा मृत्यू कुणी ठरवू शकतो का?.. हे आणि असे अनेक तात्त्विक प्रश्न मानवजातीला आजतागायत नेहमीच पडत आले आहेत. वेळोवेळी त्यांच्यावर वादविवाद झडूनही नव्या संदर्भात ते पुन:पुन्हा उद्भवतात तेव्हा त्यांच्या नव्या पैलूंसकट त्यांच्यावर होणारी नवी चर्चा ही सगळ्यांच्याच बौद्धिक, तात्त्विक, न्यायिक, सामाजिक, वैयक्तिक कसोटी पाहणारी आणि प्रगल्भतेला आव्हान देणारी ठरते. आपण माणूस म्हणून, समाज म्हणून प्रगत अवस्था गाठली आहे की नाही.

**राष्ट्रीयत्व, लैंगिकता, भौगोलिक सीमा, भाषा या सर्व भेदांपलीकडे जात, सर्वसमावेशकतेला प्राधान्य देत साहित्यजगतातील नवनव्या घडामोडींचा मागोवा घेणारा 'टाटा लिट फेस्ट' २५ ते २९ ऑक्टोबरदरम्यान आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवाचे हे चौदावे वर्ष आहे. गतवर्षीप्रमाणे यंदाही ऑनलाइन आणि प्रत्यक्ष अशा दोन स्वरूपांत महोत्सव होणार आहे.**

# मुंबईचा 'लिटफेस्ट' दसऱ्यानंतर लगेच!

महोत्सवात सलमान रश्दी, एलिफ शफाक यांसारख्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील साहित्यिकांचे विचार आणि अनुभव ऐकण्याची संधी मिळणार आहे. नरिमन पॉइंट येथील एनसीपीए, सेंट पॉल इन्स्टिट्यूट ऑफ कम्युनिकेशन एज्युकेशन आणि वांद्रे येथील टायटल बुक स्टोअरमध्ये विविध चर्चासत्रे आणि मुलाखतींचे आयोजन करण्यात आले आहे. कथा, कविता, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, कला, इतिहास, खाद्यसंस्कृती अशा विविध विषयांशी संबंधित नवे दृष्टिकोन या महोत्सवाच्या माध्यमातून मांडले जातात.

२५ आणि २६ ऑक्टोबर रोजी ऑनलाइन स्वरूपात आणि २७ ते २९ ऑक्टोबरदरम्यान प्रत्यक्ष महोत्सवस्थळी कार्यक्रम होतील. महोत्सवाचा प्रारंभ सलमान रश्दी यांच्या मुलाखतीने होणार आहे. २५ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ६ ते ६.४५ दरम्यान तिशानी दोशी ही




मुलाखत घेतील. याच दिवशी रात्री ८ ते ८.४५ दरम्यान पॅलेस्टाइनमधील नाट्यविश्वाबद्दल इसाबेला हमद यांच्याशी गिरीश शहाणे संवाद साधतील.

२६ ऑक्टोबरला विशेष आर्थिक क्षेत्रे निर्माण करणे हे लोकशाही तत्त्वांचे उल्लंघन कसे आहे, याविषयी किन स्लोबोदियन आणि पल्लवी अय्यर मते मांडतील. महोत्सवस्थळी होणाऱ्या कार्यक्रमांचा प्रारंभ २७ ऑक्टोबर रोजी 'इन फ्रेज ऑफ फ्रेज' या चर्चासत्राने होईल. त्यात खासदार शशी थरूर आणि मेहदी हसन सहभागी होतील. २८ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ६.३० ते ७.३० दरम्यान भारतीय गुप्तचर खाते कसे काम करते, याविषयीचा एक परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. त्यात मणिशंकर अय्यर आणि मीरा चड्ढा बोरवणकर यांचे अनुभव ऐकण्याची संधी मिळेल. महोत्सवाचा समारोप 'टाटा लिटरेचर लाइव्ह २०२३' या पुरस्कार सोहळ्याने होईल. महोत्सवाच्या कालावधीत चित्र, शिल्प, नाट्य, आभासी वास्तव या विषयांवरील विविध कार्यक्रमांचे आणि सादरीकरणांचेही आयोजन करण्यात आले आहे. म

होत्सवस्थळी या माध्यमांतील कलाकृतीही मांडण्यात येणार आहेत. याव्यतिरिक्त अनेक चर्चासत्रे, कथाकथनाचे कार्यक्रम, परिसंवाद आणि मुलाखती होणार असून सविस्तर वेळापत्रक HTTPS://TATALITLIVE.IN/SCHEDULES या लिंकवर उपलब्ध आहे. ऑनलाइन नोंदणीची सुविधाही उपलब्ध आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# सुप्रिया सुळेंना जवळचा चष्मा!

## अदृश्य शक्ती'वरून गोपीचंद पडळकरांची टीका

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आपल्या बहुचर्चित धनगर जागर यात्रेदरम्यान खामगाव येथे पार पडलेल्या सभेत व माध्यमांशी बोलताना आमदार गोपीचंद पडळकर यांनी नेहमीप्रमाणे 'बारामती'ला लक्ष्य केले. प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे शरद पवार आणि सुप्रिया सुळे यांच्यावर बोचरी टीका केली. बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव येथील कोल्हटकर भवनात त्यांची सभा पार पडली.**



यादरम्यान त्यांनी निवडक माध्यमांशी संवाददेखील साधला. ज्याच्यावर 'त्यांची' सावली पडली, त्याची माती झाली, अशी जहरी टीका त्यांनी नामोल्लेख न करता केली. मात्र त्यांचा इशारा कुणाकडे होता हे उपस्थित समाज बांधवांना स्पष्ट समजेल, अशीच त्यांची देहबोली होती. सुप्रिया सुळे यांनी काही वाहिन्यांना दिलेल्या मुलाखतीत, राज्यात महाराष्ट्र विरोधी अदृश्य शक्ती कार्यरत असल्याचे म्हटले होते. त्यावर बोलताना, सुप्रिया सुळे यांना जवळचा चष्मा लागला आहे. त्यामुळे 'जवळचं ही' दिसत नाही, असा उपरोधिक टोला पडळकर यांनी लगावला. धनगर समाजाच्या आरक्षणाची अंमलबजावणी झाल्यास सर्वात आधी बारामती मतदार संघ आरक्षित होऊ शकतो, असा भाकितवजा गौप्यस्फोट त्यांनी केला. या आरक्षणाच्या अंमलबजावणीमध्ये वाटेल ते अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. जरांगे पाटील यांचे आंदोलन व आजची त्यांची जालन्यातील सभा यावरही त्यांनी मत व्यक्त केले. ओबीसी समाजाच्या आरक्षणाला कुठलाही धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे, अशी आमची भूमिका आहे. आमचा मराठा समाजाच्या आरक्षणाला पाठिंबा असल्याचे त्यांनी सांगितले. आदिवासी समाज आरक्षण आणि धनगर आरक्षणाचा काडीमात्रही संबंध नसल्याचे त्यांनी सांगितले. आदिवासी समाजातील जे लोक बोलत आहेत त्यापैकी ९० टक्के आदिवासींना अजून जात प्रमाणपत्र मिळालेले नाही. दोन दिवसात किती आदिवासींची जात पडताळणी केली याची यादी जाहीर केल्यास चित्र स्पष्ट होईल, अशी माहिती पडळकर यांनी दिली.

### मराठा समाजाला आरक्षण द्यावे

» धनगर समाजाच्या आरक्षणाची अंमलबजावणी झाल्यास सर्वात आधी बारामती मतदार संघ आरक्षित होऊ शकतो, असा भाकितवजा गौप्यस्फोट त्यांनी केला. या आरक्षणाच्या अंमलबजावणीमध्ये वाटेल ते अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. जरांगे पाटील यांचे आंदोलन व आजची त्यांची जालन्यातील सभा यावरही त्यांनी मत व्यक्त केले. ओबीसी समाजाच्या आरक्षणाला कुठलाही धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे, अशी आमची भूमिका आहे. आमचा मराठा समाजाच्या आरक्षणाला पाठिंबा असल्याचे त्यांनी सांगितले. आदिवासी समाज आरक्षण आणि धनगर आरक्षणाचा काडीमात्रही संबंध नसल्याचे त्यांनी सांगितले. आदिवासी समाजातील जे लोक बोलत आहेत त्यापैकी ९० टक्के आदिवासींना अजून जात प्रमाणपत्र मिळालेले नाही.

# सावंतवाडी येथे गावसहभागी मूल्यावलोकन शिबीर!

## शिवाजी विद्यापीठाच्या समाजकार्य अभ्यासक्रमांतर्गत उपक्रम

। कोल्हापूर । प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कुल ऑफ रूरल डेव्हलपमेंट अधिविभागाच्या समाजकार्य अभ्यासक्रमांतर्गत गावसहभागी मूल्य वलोकन शिबिर कोल्हापूर जिल्ह्यातील सावंतवाडी (गर्जन ग्रामपंचायत) येथे उत्साहात पार पडले. 9 ते 14 ते ऑक्टोबर दरम्यान या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरांर्तगत समाजकार्य अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी गावचा सूक्ष्म अभ्यास करून गावच्या विकासास उपयुक्त कार्यक्रम राबवले.**



शिबिराची सुरुवात मशाल फेरीने झाली. या मशाल फेरीमध्ये विद्यामंदिर सावंतवाडी येथील विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. त्यानंतर ग्राम बैठकीमध्ये या शिबिराचा उद्देश ग्रामस्थांना सांगण्यात आला. शिवार फेरीच्या माध्यमातून शेती, पिके, मृदा याच्या माध्यमातून शेती आणि समस्यांचा अभ्यास करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक/युवती, शेतकरी गटांसोबत चर्चा, गावातील विविध सहकारी संस्थांना भेटी, गाव नकाशे, संसाधनाचे नकाशे समस्या अभ्यासून त्यावर सविस्तर चर्चा आणि उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. शाळेतील विदयार्थांसोबत प्रभात फेरी , वृक्षारोपण , विविध स्पर्धा घेण्यात आल्या. या शिबिराचा घोषवारा वाचन ग्रामसभेमध्ये करण्यात आले. या शिबिराच्या समन्वयक डॉ. उर्मिला दशवंत, गावातील प्राथमिक विद्यामंदिरचे मुख्याध्यापक अर्जून तांदळे, शिक्षक दिपक दगरखैर, ग्रामपंचायत सदस्य जग्गनाथ सावंत, विठ्ठल सावंत, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष वसंत सावंत, ज्योती सावंत, रेश्मा सावंत, प्रदीप सावंत, मोहन सावंत, मारुती सावंत, बंडू सावंत ,अंगणवाडी सेविका सुनंदा नाईक आणि सर्व ग्रामस्थ यांनी हे शिबिर आयोजन करण्यासाठी सहकार्य केले.

### शिबिरात यांचा सहभाग...

» या शिबिरात प्रिती कांबळे, शाहीन पाटील, स्वाती राऊत, आश्विनी खोत , योगिता मस्कर , पायल कांबळे, प्रेम भोसले, स्वप्निल बारवाडे, गौरव दाभाडे हे समाजकार्याचे विद्यार्थी सहभागी झाले. या शिबिराची सांगता ग्रामसभेने करण्यात आली

# राजा सत्तेसाठी भुकेला असतो तेव्हा!

## प्रकाश राज यांची उपासमार निर्देशांकावरून मोदींवर टीका

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जागतिक उपासमार निर्देशांक म्हणजेच GLOBAL HUNGER INDEX 2023 मध्ये भारताचं स्थान हे १२५ देशांच्या यादीत १११ वं आहे. कुपोषण, उपासमार, बेकारी, गरीबी हे भारतातले मुद्दे यामुळे पुन्हा एकदा समोर आले आहेत. भारतात उपासमारीची भीषण स्थिती असल्याचा निष्कर्षही काढला जातो आहे. अशात दाक्षिणात्य अभिनेते प्रकाश राज यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींचा एक फोटो X वर पोस्ट करत जोरदार टीका केली आहे.**




### घंटा वाजवायला कुणी सांगितलं

प्रकाश राज यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जेवण करताना एक फोटो पोस्ट केला आहे आणि त्यावर कॅप्शन लिहिली आहे राजा जेव्हा सत्तेसाठी भुकेला असतो तेव्हा.. तसंच सिटिझन हंगर इंडेक्स असंही लिहिलं आहे. अभिनेते प्रकाश राज यांनी मोदींवर याआधीही टीका केली आहे. त्यापाठोपाठ आता ही पोस्टही समोर आली आहे. प्रकाश राज यांनी ८ ऑक्टोबरलाच त्यांनी एक पोस्ट केली होती. ज्यामध्ये त्यांनी 'वॅक्सिन वॉर' सिनेमातला नाना पाटेकरांच्या तोंडी असलेला संवाद पोस्ट केला होता. 'पंतप्रधान म्हणतात की आम्ही व्हायरसशी लढाई जिंकू ती विज्ञानानेच' या आशयाचा तो संवाद होता. ज्यावर प्रकाश राज यांनी विचारलं होतं की मग थाळ्या, टाळ्या वाजवायला आणि घंटा वाजवायला कुणी सांगितलं होतं?

प्रकाश राज यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जेवण करताना एक फोटो पोस्ट केला आहे आणि त्यावर कॅप्शन लिहिली आहे राजा जेव्हा सत्तेसाठी भुकेला असतो तेव्हा.. तसंच सिटिझन हंगर इंडेक्स असंही लिहिलं आहे. अभिनेते प्रकाश राज यांनी मोदींवर याआधीही टीका केली आहे. त्यापाठोपाठ आता ही पोस्टही समोर आली आहे.

प्रकाश राज यांनी ८ ऑक्टोबरलाच त्यांनी एक पोस्ट केली होती. ज्यामध्ये त्यांनी 'वॅक्सिन वॉर' सिनेमातला नाना पाटेकरांच्या तोंडी असलेला संवाद पोस्ट केला होता. 'पंतप्रधान म्हणतात की आम्ही व्हायरसशी लढाई जिंकू ती विज्ञानानेच' या आशयाचा तो संवाद होता. ज्यावर प्रकाश राज यांनी विचारलं होतं की मग थाळ्या, टाळ्या वाजवायला आणि घंटा वाजवायला कुणी सांगितलं होतं? त्यांच्या या पोस्टवरुनही त्यांच्यावर टीका झाली होती.

ग्लोबल हंगर इंडेक्सवरुन पंतप्रधान मोदींचा फोटो पोस्ट करत प्रकाश राज यांनी टीका केली आहे. या निर्देशांकानुसार भारताची पाकिस्तानच्याही खाली घसरण झाली आहे. यादीनुसार, पाकिस्तान १०२व्या स्थानी, बांगलादेश ८१व्या स्थानी तर नेपाळ ६९व्या स्थानी आहे. एकीकडे आशिया खंडातील आपल्या शेजारी राष्ट्रांच्या तुलनेत भारताचं स्थान बरंच खाली घसरलं असताना दुसरीकडे दक्षिण आशिया आणि आफ्रिकेतील देशांपेक्षा भारताचं मानांकन चांगलं असल्याचंही यादीतून स्पष्ट झालं आहे. या देशांना सरासरी प्रत्येकी २७ इतकं मानांकन मिळालं आहे.

# शत्रूशी लढण्यासाठी सर्व ताकद वापरू

## इस्रायलचं पंतप्रधान नेतान्याहूंचा हमासला इशारा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**इस्रायल आणि हमास यांच्यातील युद्धाला सात दिवस पूर्ण झाले आहेत. हमासने शनिवारी, ७ ऑक्टोबरला अनपेक्षितपणे इस्रायलवर रॉकेट हल्ले केले होते. या हल्ल्यानंतर इस्रायलही आक्रमक झाला आहे. शुक्रवारी इस्रायलने २४ तासांत गाझा सोडण्याचे आदेश नागरिकांना दिले होते. अशातच इस्रायलचं पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी हमासला थेट इशारा दिला आहे. बदला घेण्यास आताच सुरूवात झाली आहे, असं बेंजामिन नेतान्याहू यांनी म्हटलं आहे.**



### इस्त्रायल देश शोकसागरात बुडाला

नरसंहारामुळे संपूर्ण इस्त्रायल देश शोकसागरात बुडाला आहे. हे आमच्या प्रत्येकावरील संकट आहे. आम्ही दु:खात आहोत असे अवराहम यांनी 'लोकसत्ता'ला सांगितले. तेव्हा हा हल्ला झाला. या हल्ल्याची भीषणता सांगताना, आपल्या नागरिकांच्या झालेल्या मृत्यूबद्दल बोलतांना अवराहम यांना रडू कोसळले. त्यांनी केलेला हल्ला हे युध्द नाही तर अमानुष विकृती आहे अशा शब्दात त्यांनी आपला संताप व्यक्त केला.

“शत्रूंनी किंमत मोजायला सुरुवात केली आहे. पुढं काय होईल, सांगता येत नाही. पण, ही फक्त सुरुवात आहे. ज्यू नागरिकांवर लादलेल्या युद्धाला आम्ही कदापीही माफ करणार नाही. शत्रूशी लढण्यासाठी सर्व ताकदीचा वापर करू,” असं बेंजामिन नेतान्याहू म्हणाले. हमासविरोधात जमिनीवरील मोहीम सुरू करण्यासाठी सैन्य तयार असल्याचं इस्रायलच्या लष्कराकडून शुक्रवारी सांगण्यात आलं. पण, “इस्रायलच्या जमिनी मोहिमेमुळे अनेक नागरिक मारले जातील. जे अमान्य आहे,” अशा शब्दांत पुतिन यांनी इस्रायलला सुनावलं होतं. “इस्रायलवर अनपेक्षितपणे हल्ला झाला. इस्रायलला आपल्या संरक्षणाचा संपूर्ण अधिकार आहे. पण, आता रक्तपात थांबला पाहिजे. इस्रायलनं गाझावर जमिनीवरील हल्ले केल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील. नागरिकांचे मृत्यू अमान्य आहेत. मुख्य गोष्ट म्हणजे रक्तपात थांबवणे गरजेचं आहे. रशिया सर्वांशी चर्चा करण्यास तयार आहे,” असं आवाहन व्लादिमीर पुतिन यांनी केलं होतं. इस्त्रायलच्या गाझा पट्टीत हमासच्या दहशतवाद्यांनी शनिवारी केलेल्या हल्ल्यामुळे जग हादरलं आहे. दोन्ही बाजूने प्रतिहल्ले होत आहे. संपूर्ण देशात भीषण परिस्थिती उद्भवली आहे. आता सावरलेला प्रत्येक इस्त्रायली ज्यू या हल्ल्यांना तोंड देण्यासाठी सज्ज झाला आहे. आम्हाला कुणाची मदत नको आम्ही एकटे लढण्यासाठी समर्थ आहोत, असे इस्त्रायली राष्ट्राध्यक्षांनी जाहीर केले आहे. तो विश्वास सार्थ ठरविण्यासाठी प्रत्येक इस्त्रायली कुटुंबातील एक जण युध्दासाठी रवाना झाला आहे.

# अदाणींचं नाव घेतल्यानं न्यायाधीश संतापले!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

आम आदमी पक्षाचे खासदार संजय सिंह यांना ४ ऑक्टोबरला दिल्लीतील कथित मद्य घोटाळ्याप्रकरणी अंमलबजावणी संचालनालयानं ( ईडी ) अटक केली आहे. शुक्रवारी ( १३ ऑक्टोबर ) संजय सिंह यांना दिल्लीमधील राउज एवेन्यू न्यायालयात हजर करण्यात आलं होतं. यावेळी संजय सिंह यांच्या एका कृतीवरून न्यायाधीशांनी नाराजी व्यक्त केली आहे.

संजय सिंह यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. पुढील सुनावणी २७ ऑक्टोबरला होणार आहे.

यावेळी न्यायालयानं संजय सिंह यांना आपलं मत मांडण्याची संधी दिली. तेव्हा संजय सिंह यांनी ईडीला लक्ष्य करत उद्योगपती गौतम अदाणी यांचा उल्लेख केला. संजय सिंह म्हणाले, “आठ दिवसांपासून ईडीच्या कोठडीत आहे. पण, एकाच व्यक्तीनं २-३ तासच चौकशी केली. तुमच्या आईस पैसे का दिले? कुणाला पैशांची मदत केली का? असे सवाल ते विचारत आहेत. त्यांनी गांभीर्यानं तपास करायला हवा होता. पण, ईडी हा एक मनोरंजनाचा भाग झाला आहे. यानंतर संजय सिंह यांनी अदाणी यांचं नाव घेतलं. “अदाणी घोटाळ्याची चौकशी करण्यासाठी याचिका दाखल केली होती.

पण, त्याचा तपास झाला नाही,” असा सवाल संजय सिंह यांनी उपस्थित केला. यावर न्यायाधीश एम.के. नागपाल चांगलेच संतापले. “याप्रकरणाचा येथे काहीही संबंध नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अदाणींबद्दल येथे बोलू दिले जाणार नाही. तुमच्या प्रकरणाशी संबंधित बोलायचे असेल, तर बोलू शकता. पण, राजकीय भाष्य करता येणार नाही. तुम्हाला हेच करायचे असेल, तर इथे येण्याची गरज नाही. दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून तुम्हाला हजर केले जाईल,” असं एम.के. नागपाल यांनी म्हटलं.



# शारदीय नवरात्रीचे नऊ दिवस, नवरंगांचे महत्त्व!

## भारतीय घरांमध्ये नवरात्री उत्सवाला महत्त्वाचे स्थान

पुणे । वृत्तसंस्था

**नवरात्र हा एक हिंदू सण आहे. जो देशात वर्षातून दोनदा साजरा केला जातो. चैत्र महिन्यात, म्हणजे चैत्र नवरात्री (मार्च-एप्रिल) आणि शारदा नवरात्री 2023 (ऑक्टोबर-नोव्हेंबर). नवरात्री या शब्दाचा अर्थ संस्कृतमध्ये नऊ रात्री असा होतो. आणि हा सण या दोन्ही महिन्यांत नऊ दिवसांचा असतो. या नऊ दिवसांसाठी, नऊ नवरात्रीचे रंग नियुक्त केले आहेत, प्रत्येकाचे स्वतःचे नवरात्री रंगाचे महत्त्व आहे. तसेच, सणांमध्ये भर घालण्यासाठी, लोक अनेकदा नवरात्रीच्या रंगांनुसार त्यांच्या नवरात्रीच्या मंदिराची सजावट घरी करतात. नवरात्रीच्या उत्सवाला विशेषतः भारतीय घरांमध्ये महत्त्वाचे स्थान आहे.**

देशाच्या विविध भागात नवरात्र वेगवेगळ्या पद्धतीने साजरी केली जाते. तथापि, हिंदू देवी काली किंवा दुर्गा यांचा विजय ही नवरात्र उत्सवामागील मूळ संकल्पना आहे. देशभरातील असंख्य स्त्रिया नवरात्रीला प्रिय आहेत. ज्या उपवास करतात आणि नवरात्री दरम्यान विशेष पदार्थ आणि पेये घरी बनवतात. नवरात्रोत्सवाच्या या ९ दिवसांत ते कपडे घालून मित्र आणि कुटुंबाला भेट देतात. शारदीय नवरात्री 2023 चे नऊ रंग येथे आहेत. ज्यांबद्दल तुम्हाला माहित असले पाहिजे. नवरात्रोत्सव संपेपर्यंत दररोज यापैकी एका नवरात्रीच्या रंगात कपडे घालण्यासह आपल्या नवरात्रीच्या मंदिराच्या सजावटीसाठी ही थीम घरच्याघरी असणे खूप खास मानले जाते. जर तुम्ही शारदीय नवरात्रीच्या तारखांबद्दल विचार करत असाल, तर शारदीय नवरात्री 2023 हा 15 ऑक्टोबर 2023 ते 24 ऑक्टोबर 2023 या कालावधीत साजरा केला जाईल. 24 ऑक्टोबर हा दसरा आहे. तर, आपल्या शरद नवरात्रीच्या मंदिराची सजावट घरातूनच सुरू करा आणि नवरात्रीच्या रंगांनुसार 2023 नुसार आपल्या दैनंदिन पोशाखांची योजना करण्यास विसरू नका.



### 9 नवरात्रीचे रंग 2023 आणि नवरात्रीच्या रंगांचे महत्त्व

- नवरात्रीचा पहिला दिवस (१५ ऑक्टोबर २०२३) – नारिंगी
- नवरात्रीचा दुसरा दिवस (१६ ऑक्टोबर २०२३) – पांढरा
- नवरात्रीचा तिसरा दिवस (१७ ऑक्टोबर २०२३) – लाल
- नवरात्रीचा चौथा दिवस (१८ ऑक्टोबर २०२३) – रॉयल ब्लू
- नवरात्रीचा पाचवा दिवस (19 ऑक्टोबर 2023) – पिवळा
- नवरात्रीचा सहावा दिवस (20 ऑक्टोबर 2023) – हिरवा
- नवरात्रीचा सातवा दिवस (२१ ऑक्टोबर २०२३) – राखाडी
- नवरात्रीचा आठवा दिवस (२२ ऑक्टोबर २०२३) – जांभळा
- नवरात्रीचा नववा दिवस (23 ऑक्टोबर 2023) – मोरपिसी हिरवा

# टीम इंडियाचा आठवावा प्रताप!

## » हायव्होल्टेज सामन्यात पाकिस्तानला 7 विकेटने चिरडले

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**एकदिवसीय विश्वचषक २०२३ मध्ये शनिवारी (१४ ऑक्टोबर) पारंपारिक प्रतिस्पर्धी भारत आणि पाकिस्तान यांच्या दरम्यान सामना खेळला गेला. रोमहर्षक सामन्याची अपेक्षा असताना यजमान भारतीय संघाने पाकिस्तानला या सामन्यात डोके वर काढू दिले नाही. कामगिरी केल्यानंतर कर्णधार रोहित शर्मा व श्रेयस अय्यर यांनी तुफानी फटकेबाजी करत भारतीय संघाला विजय मिळवून दिला.**

या विजयासह भारतीय संघाने सलग तीन विजय पूर्ण केले. तसेच पाकिस्तानविरुद्ध विश्वचषकातील आपली विजयाची परंपरा कायम राखली. हिटमॅनचे शतक थोडक्यात हुकले, ते जर पूर्ण झाले असते तर हा विजय आणखी परिपूर्ण झाला असता. मात्र, वन डे वर्ल्ड कप स्पर्धेत भारताने पाकिस्तानविरुद्धची अपराजित मालिका ८-० अशी कायम राखली. या विजयासोबत भारतीय संघ गुणतालिकेत अव्वल स्थानी पोहोचला. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर भारताचा कर्णधार रोहित शर्मांने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पाकिस्तानचा संघ ४२.५ षटकांत १९१ धावांवर गारद झाला. प्रत्युत्तरात भारताने ३०.३ षटकांत ३ गडी गमावत १९२ धावा करून सामना जिंकला. टीम इंडियाने विश्वचषकाच्या इतिहासात पाकिस्तानविरुद्धची विजयी मालिका सुरू ठेवली आहे. त्याचा हा आठवा विजय आहे. आता या स्पर्धेत भारताचा त्याच्याविरुद्ध पराभव झालेला नाही. पाकिस्तानकडून मिळालेल्या १९२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाची सुरुवात चांगली झाली नाही. त्याने आपल्या खेळीत चार चौकार मारले. शाहीन आफ्रिदीने त्याला शादाब खानकरवी झेलबाद केले. शुभमन फॉर्ममध्ये दिसत आहे आणि आगामी सामन्यांसाठी टीम इंडियाच्या दृष्टिकोनातून ही चांगली बातमी आहे. तो बाद झाल्यानंतर विराट कोहली क्रीजवर आला. कोहलीने रोहितसोबत दुसऱ्या विकेटसाठी ५६ धावांची भागीदारी केली. पाकिस्तानविरुद्ध सहसा मोठी खेळी खेळणारा विराट या सामन्यात विशेष काही करू शकला नाही. क्रीजवर राहिल्यानंतर तो बाद झाला. कोहलीने १८ चेंडूत तीन चौकारांच्या मदतीने १६ धावा केल्या. हसन अलीच्या चेंडूवर मोहम्मद नवाज झेलबाद झाला. त्याच्यानंतर श्रेयस अय्यर क्रीझवर आला. श्रेयसने कर्णधार रोहित शर्मासोबत तिसऱ्या विकेटसाठी ७७ धावांची भागीदारी केली. रोहित शर्माला सलग दुसऱ्या सामन्यात शतक झळकावता आले नाही. अफगाणिस्तानविरुद्ध त्याने १३१ धावांची खेळी केली होती. या सामन्यातही त्याला शतक झळकावण्याची संधी होती, मात्र त्याला तसे करता आले नाही. रोहित ६३ चेंडूत ८६ धावा करून पंव्हेलियनमध्ये परतला. त्याने आपल्या खेळीत सहा चौकार आणि सहा षटकार मारले. या काळात त्याचा स्ट्राइक रेट १३६.५१ होता. रोहितने एकदिवसीय क्रिकेटमध्ये ३०० षटकारही पूर्ण केले. पाकिस्तानचा माजी कर्णधार शाहिद आफ्रिदी आणि वेस्ट इंडिजचा माजी सलामीवीर ख्रिस गेल यांच्यानंतर अशी कामगिरी करणारा तो तिसरा फलंदाज ठरला. रोहित शर्मा बाद झाल्यानंतर के.एल. राहुलसह श्रेयस अय्यरने सामना संपवला. या दोन्ही फलंदाजांनी चौथ्या गड्यासाठी ३६ धावांची नाबाद भागीदारी केली. अय्यरने चौकार मारून आपले अर्धशतक पूर्ण केले आणि सामना संपवला. ६२ चेंडूत ५३ धावा केल्यानंतर तो नाबाद राहिला. अय्यरने तीन चौकार आणि दोन षटकार मारले. के.एल. राहुलने २९ चेंडूत १९ धावा केल्यानंतर नाबाद राहिला. त्याच्या बॅटमधून दोन चौकार आले. तत्पूर्वी, पाकिस्तानकडून कर्णधार बाबर आझमने सर्वाधिक ५० धावा केल्या. गेल्या सामन्यात शतक झळकावणाऱ्या मोहम्मद रिझवानचे यावेळी अर्धशतक हुकले. तो ४९ धावांवर पंव्हेलियनमध्ये परतला. इमाम उल हकने ३६, अब्दुल्ला शफीकने २० आणि हसन अलीने १२ धावा केल्या. याशिवाय सहा फलंदाजांना दुहेरी आकडा गाठता आला नाही.




### श्रेयसने विजयी चौकार ठोकले

» रोहित शर्मा बाद झाल्यानंतर के.एल. राहुलसह श्रेयस अय्यरने सामना संपवला. या दोन्ही फलंदाजांनी चौथ्या गड्यासाठी ३६ धावांची नाबाद भागीदारी केली. अय्यरने चौकार मारून आपले अर्धशतक पूर्ण केले आणि सामना संपवला. ६२ चेंडूत ५३ धावा केल्यानंतर तो नाबाद राहिला. अय्यरने तीन चौकार आणि दोन षटकार मारले. के.एल. राहुलने २९ चेंडूत १९ धावा केल्यानंतर नाबाद राहिला. त्याच्या बॅटमधून दोन चौकार आले.

# बाबर आझमचे कर्णधारपद धोक्यात?

## » अल्लाहने लिहून ठेवलंय तितकंच मिळेल : आझम

नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमला विश्वचषक स्पर्धेत भारताकडून पराभव पत्करावा लागला तरी त्याचे कर्णधारपद गमावण्याची भीती वाटत नाही. अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर १४ ऑक्टोबर रोजी दोन्ही कट्टर प्रतिस्पर्धी त्यांच्या ऐतिहासिक प्रतिस्पर्ध्यामध्ये एक नवीन अध्याय जोडण्यासाठी सज्ज आहेत.**




या मोठ्या सामन्याआधी, जेव्हा पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझमला विचारण्यात आले की, "या विश्वचषकात तुम्हाला तुमच्या कर्णधारपदाची चिंता आहे का, जर तुमचा संघ भारताविरुद्ध हरला तर काय होईल?" यावर बाबरने सूचक उत्तर दिले आहे. दोन्ही संघ आपले मागील सामने जिंकून मैदानात उतरले आहेत. २८ वर्षीय बाबर आझमच्या उत्तरात खऱ्या अर्थाने आत्मविश्वास दिसून आला. सामन्यापूर्वीच्या पत्रकार परिषदेदरम्यान, एका पत्रकाराने बाबरला भारताकडून हरल्यानंतर अनेक कर्णधारांनी कर्णधारपद गमावल्याची आठवण करून दिली, तेव्हा त्याने चोख प्रत्युत्तर दिले. बाबर म्हणाला, "माझं कर्णधारपद एका सामन्यातून जाणार नाही, मला जेवढे अल्लाहने लिहून ठेवलंय तितकंच मिळेल. त्यामुळे याचा फारसा विचार करत नाही." बाबर आझम पुढे म्हणाला की, "इतिहासात मागे काय झाले, याचा आम्ही फारसा विचार करत नाही. सध्या आम्ही आजच्या सामन्यावर लक्ष केंद्रित करू इच्छितो. विक्रम हे नेहमी तोडण्यासाठी असतात आणि आज तो आम्ही मोडण्याचा प्रयत्न करू. बाबरच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानने २०२२ मध्ये टी२० विश्वचषकाची अंतिम फेरी गाठली होती. मेन इन ग्रीन हा नुकताच आयसीसी क्रमवारीत अव्वल स्थानावर भारताकडून विस्थापित होण्यापूर्वी जगातील प्रथम क्रमांकाचा वन डे संघ बनला होता. या ऐतिहासिक सामन्याबाबत बरीच चर्चा आणि अपेक्षा आहेत. विशेषत: पाकिस्तानने एकदिवसीय विश्वचषकात आतापर्यंत भारताला कधीही पराभूत केलेले नाही, यावेळी हा इतिहास तसाच राहणार की बदलणार, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. बाबरला भारत विरुद्ध पाकिस्तान सामन्याच्या दबावाबाबत विचारले असता, तो म्हणाला की, "तरुणांना मार्गदर्शन करणे आणि गोष्टी सोप्या ठेवणे हे सगळ्यात जास्त महत्त्वाचे आहे. प्रत्येक चेंडू कसा खेळायचा याचाच विचार करणे फार पुढचा किंवा मागे काय घडले हे संघातील खेळाडूंना विसरायला लावणे हे वरिष्ठ माझे काम आहे." बाबर पुढे म्हणाला, "दबाव हाताळण्याचा मला अनुभव आहे.

# गुणतालिकेत भारतला मिळाले अव्वल स्थान

नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

भारतीय गोलंदाजाच्या भेदक माऱ्यासमोर पाकिस्तानच्या फलंदाजांचा उडालेला धुव्वा आणि त्यांनतर कर्णधार रोहित शर्माची धडाकेबाज ८६ धावांची खेळी आणि श्रेयस अय्यरच्या संयमी अर्धशतकाच्या जोरावर आज (दि.१४) भारताने क्रिकेट वन-डे विश्वचषक स्पर्धेतील साखळी सामन्यात पाकिस्तान विरुद्ध ७ गडी राखत विजय मिळवला. या दिमाखदार कामगिरीमुळे भारतीय क्रिकेट संघाने घटस्थापनेच्या पूर्वसंध्येला वन-डे विश्वचषक स्पर्धेत पाकिस्तान विरुद्ध आपली विजयाची परंपरा कायम राखली आहे. वन-डे विश्वचषक स्पर्धेत भारताचा हा सलग आठवा विजय ठरला आहे.

या स्पर्धेत पाकिस्तान विरुद्धचे 'अजिंक्य'पद टीम इंडियाने अबाधित ठेवले आहे. भारताने नाणेफेक जिंकत प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. कर्णधार रोहित शर्माचा हा निर्णय भारतीय गोलंदाजाने आपल्या कामगिरीने सार्थ ठरवला.

वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज,जसप्रीत बुमराह यांच्यासह अष्टपैलू हार्दिक पंड्याचा भेदक मारा, कुलदीप यादव आणि रवींद्र जडेजाच्या फिरकीच्या जादूसमोर पाकिस्तानचा डाव पत्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळला. कर्णधार बाबर आझम आणि स्टार फलंदाज रिझवान या दोघांच्या फलंदाजीच्या जोरावर पाकिस्तानने १९१ धावांपर्यंत मजल मारली होती. ३० षटकांत पाकिस्तानच्या ३ बाद १५६ धावा होत्या. यानंतर अवघ्या ३३ धावांत पाकिस्तानने ६ गडी गमावले. (IND VS PAK WORLD CUP) पाकिस्तानच्या संघ अवघ्या ४२.५ षटकांमध्येच तंबूत परतला.